पनवेल (प्रतिनिधी) विकासाचे पर्व आणून अवघ्या पाच वर्षात अनेक प्रकल्प व योजना राबवित पनवेलचा चेहरामोहरा बदलून टाकण्याचे काम कर्तव्यदक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे, असे गौरवोदगार राज्याचे वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ व रायगड जिल्हा संपर्क मंत्री मोहम्मद आरिफ नसीम खान यांनी आज पनवेलमध्ये काढले.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून रायगड जिल्हयातील अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींकरिता पनवेलमध्ये शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसरात बांधण्यात आलेल्या वसतीगृह इमारतीचे उदघाटन मंगळवारी (दि.१९) नामदार नसीम खान यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्याप्रसंगी उदघाटक म्हणून ना.नसीम खान बोलत होते.

देशात प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र नंबर वन आहे, असे नामदार नसीम खान यांनी सांगून राज्यातील १८ जिल्हयात अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थीकरिता वस्तीगृहांचे काम सुरू असल्याचे सांगितले.त्यामध्ये चंद्रपूर, कोल्हापूर येथील वसतीगृह हस्तांतरित करण्यात आले असून पनवेलमधील तिसऱ्या वसतीगृहाचे उदघाटन आज झाल्याचे सांगतानाच वार्षिक अडिच लाख रूपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्याला या वसतीगृहात विनाशुल्क निवासाची सोय करण्यात येणार असल्याचे सांगून त्या संदर्भातील फि अल्पसंख्यांक विभाग भरणार असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. रायगड जिल्हयात वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आग्रह धरत हे वसतीगृह पनवेलमध्येच व्हावे, अशी आग्रही मागणी केली व सतत पाठपुरावाही केला. त्यांच्या प्रयत्नातूनच हे वसतीगृह उभे राहिले असून त्यांनी इमानदारीने केलेल्या कामामुळेच पनवेलमध्ये विविध प्रकल्प साकारले आहेत आणि यापुढेही अशाच पध्दतीने विकासाचा पर्व सुरू ठेवण्यासाठी पनवेलकरांनी यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहून साथ द्यावी, असे आवाहनही ना.खान यांनी केले. ते पुढे म्हणाले की, अल्पसंख्यांक समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याचा विकास झाला पाहिजे, यासाठी कॉंग्रेस आघाडी कटीबध्द आहे. मागासलेल्या प्रत्येक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना, प्रकल्प व उपक्रम राबवून कॉंग्रेस आघाडी नेहमीच प्रयत्नशिल राहिली आहे, असे सांगतानाच त्यांनी मोदींच्या अच्छे दिनच्या वल्गनांवर टिका केली. नुसत्या अच्छे दिनच्या घोषणा करून विकास होत नाही, तर जनतेच्या विकासासाठी कामे करून चांगले दिवस येतात, असा टोलाही त्यांनी आपल्या भाषणातून मोदी सरकारला लगावला.

अध्यक्षीय भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेलच्या विकासाठी दिलेल्या विशेष सहकार्याबद्दल राज्य सरकारचे आभार व्यक्त केले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली व नामदार नसीम खान यांनी दिलेल्या योगदानातून पनवेलमध्ये वसतीगृहाचे स्वप्न साकारले आहे. सर्वसामान्यांचा विकास हा उद्देश घेवून कॉंग्रेस आघाडी प्रणित सरकारने राजीव गांधी आरोग्य जीवनदायी योजना, अन्नसुरक्षा विधेयक अशा अनेक योजना तसेच विविध उपक्रम व प्रकल्प राबवित महाराष्ट्राचे जीवन सुखकर करण्याचे काम केले आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.ते पुढे म्हणाले की, नामांकित शिक्षण संस्था पनवेलमध्ये येत आहेत, असे असताना जिल्हयातील अल्पसंख्यांक विद्यार्थीनी पनवेलमध्ये शिक्षणासाठी येत असतात परंतु निवासाची सोय नसल्यामुळे त्यांना मोठया प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत होते, या वसतीगृहाच्या निमित्ताने त्यांना उच्च व संरक्षित शिक्षण घेण्यास मदत होणार आहे. उडडाणपूल, प्रशासकीय भवन, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, उपजिल्हा रूग्णालय, नाटयगृह, क्रीडा संकुल, असे विविध प्रकल्प साकारत असतानाच एमएमआरडीएच्या माध्यमातून आणखी १६१ कोटी रूपयांचा निधी पनवेलच्या विकासासाठी मंजूर झाला असून पनवेलसह रायगडच्या विकासाला कॉंग्रेस आघाडी सरकारने चालना दिली असल्याचेही त्यांनी सांगितले.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या सहसचिव अैनुल अत्तार यांनी वसतीगृहासंदर्भात आपल्या प्रास्ताविकातून माहिती देताना सांगितले की, ४ कोटी ९७ लाख रूपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या वसतीगृहाची सुसज्ज इमारत ५० बाय ५० मीटर आकाराची असून १०८ विद्यार्थीनींची निवास व्यवस्था येथे करण्यात आली आहे. एकूण पाच मजली असलेल्या इमारतीत प्रतिक्षा कक्ष, वसतीगृह अधिक्षक कार्यालय, गृहपाल निवास, भोजन कक्ष, स्वयंपाक गृह, भांडार गृह, अभ्यासिका कक्ष तसेच अपंग विद्यार्थीकरिताही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या समारंभात जिल्हयातील अल्पसंख्यांक समाजाच्या विविध संस्था-संघटनांनी नामदार नसीम खान व आमदार प्रशांत ठाकूर यांचा सत्कार करून त्यांच्याप्रती आभार व्यक्त केले. यावेळी सुसज्ज व दर्जेदार वसतीगृह निर्माण करून दिल्याबद्दल ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टचे संचालक परेश ठाकूर यांचा नामदार नसीम खान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

समारंभास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, नगराध्यक्षा चारूशिला घरत, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रविण शिंदे, तहसिलदार पवन चांडक, प्रदेश कॉंग्रेसचे सदस्य अरूणशेठ भगत, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, अल्पसंख्यांक विभागाचे अश्फाक खम्से, फादर जॉर्ज, प्राचार्य एम.एम.सुरकुटवार, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, उपनगराध्यक्ष मदन कोळी, गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश विनेदार, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद, नगरसेवक लतीफ शेख, रमेश गुडेकर, नगरसेविका नाझ हाफीज, माजी नगरसेवक सिराज सय्यद, आवेस मस्ते, प्रभाकर बहिरा, जाम मशिद प्रमुख इमाम कय्युम मौलाना, जैन कौन्सिल ऑफ इंडियाचे श्री.परमार, प्राचार्या रमा भोसले, मुकीद काझी, ताहीर पटेल, समीना साठी, इक्बाल काझी, इब्राहिम मेटकर, नसीम कच्छी, यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, अल्पसंख्यांक समाजातील बंधू-भगिनी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनिल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन बुधेश रंगारे यांनी केले.